# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/03/2023 (बुधवार) दुपार

---

## जबर दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १० किमी अंतरावर खापा टि पॉईंटजवळ नागपुर ते सावनेर रोड पाटणसावंगी येथे दिनांक २०/०३/२०२३ चे २०.३० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– सुरज महादेवरावजी कडु, वय १८ वर्ष, रा. वार्ड क्र. ५ कुभांर मोहल्ला पाटणासावंगी सावनेर याने आरोपी नामे– १) राहुल ठाकुर, रा. टाकळी भन्याळी याला बारा हजार रू. उसने दिले होते. आपले पैसे परत मागितले असता ५०००/– रू वापस दिले व उरलेले पैसे मागितले असता फिर्यादीला खापा टिपॉईंट जवळ नागपुर ते सावनेर रोड पाटणसावंगी येथे बोलविले व ‘‘मी तुझे पैसे देत नाही जे बनते करून घे’’ असे म्हणुन हातबुक्याने मारपिट केली. शेडच्या वेळवाचे काठीने फिर्यादीच्या डोक्यावर, डावे कानावर दोन्ही पायावर मारून जख्मी केले आरोपी सोबत त्याचा मित्र आरोपी क्र. २) नामे– मोहन पन्नामी रा. खापरखेडा याने फिर्यादीस मागुन पकडुन पुन्हा मारण्यास सांगुन दोघांनी शिवीगाळ करून पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/१८१६ शेरे मो. नं. ८३२९९३६६२८ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. रामटेक** :– दिनांक १९/०३/२०२३ चे २१.०० वा. ते २०/०३/२०२३ चे ०५.०० वा. पर्यतं पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ६ महाने ही रात्री दिनांक १९/०३/२०२३ ला तिच्या आई जवळ झोपली होती. दि. २०/०३/२०२३ ला सकाळी उठुन बघीतले तर फिर्यादीला त्याची मुलगी त्याच्या पत्नी जवळ झोपलेली दिसली नाही. त्यामुळे फिर्यादीने त्याच्या मोठया मुलीला, मुलाला व पत्नीला विचारले असता मुली बाबत कोणालाच ती कुठे गेली काही माहीत नाही. तिचा आजुबाजुचे गावाला व नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आलेली नाही करीता तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी निशा भुते मॅडम पोस्टे रामटेक मो. क्र. ९८२२५६६१८० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर